दैनिक अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २१८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२ नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# राज्याला दिलासा ; दैनंदिन कोरोना रुग्ण संख्या हजाराच्या खाली

## राज्याला कोरोनावर नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने मोठे यश

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याला आज कोरोनावर नियंत्रण मिळवण्याच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळाला असून आज दैनंदिन रुग्णसंख्या हजाराच्या खाली घसरली आहे. तसेच बरे होणाऱ्या रुग्णांमध्येही वाढ झाली असून आज दैनंदिन मृत्यूसंख्या देखील कमी झाल्याने आशादायक चित्र आहे. शिवाय, राज्यातील एकूण सक्रिय रुग्णसंख्याही १५ हजारांवर घसरली आहे. राज्याच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज दिवसभरात राज्यात ८०९ इतक्या नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. काल ही संख्या १ हजार १७२ इतकी होती. तर आज दिवसभरात एकूण १ हजार ९०१ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. काल ही संख्या १ हजार ३९९ इतकी होती. तर, आजही १० रुग्णांचा मृत्यू झाला. काल ही संख्या २० इतकी होती.



आज राज्यात झालेल्या १० रुग्णांच्या मृत्यूंनंतर राज्याच्या मृत्यूदर २.१२ टक्क्यांवरच स्थिर आहे. याबरोबर राज्यात आतापर्यंत एकूण ६४ लाख ५२ हजार ४८६ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.५९ टक्के इतके आहे. आज राज्यातील एकूण सक्रिय रुग्णांची संख्या १५ हजार ५५२ इतकी आहे. काल ही संख्या १६ हजार ६५८ इतकी होती.

या बरोबरच राज्यातील सक्रिय रुग्णांचा जिल्हानिहाय विचार करता मुंबई जिल्ह्यात सक्रिय रुग्णांची संख्या सर्वाधिक आहे. मुंबईत हा आकडा ४ हजार ५०३ इतकी आहे. तर पुणे जिल्ह्यात हा आकडा ३ हजार २१० इतकी आहे. ठाणे जिल्ह्यात ही संख्या १ हजार ६१८, तर अहमदनगरमध्ये ही संख्या १ हजार ८७१ इतकी आहे. त्या खालोखाल साताऱ्यात ही संख्या ४७० अशी आहे.

तसेच, सांगलीत एकूण ३८९ इतकी आहे. तर, सोलापुरात ही संख्या ३१८ इतकी आहे. तर, नाशिकमध्ये सक्रिय रुग्णांची संख्या ५५७, रत्नागिरीत १४८ इतकी कमी झाली आहे, तर सिंधुदुर्गात ती ३२६ इतकी आहे.

## संक्षिप्त...

### देशातील ४६ रेल्वे स्टेशन्स बॉम्बस्फोटात उडवण्याची धमकी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिवाळी आणि आगामी उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा अलर्ट घोषित करण्यात आलाय.

दहशतवादी संघटना 'लष्कर ए तोयबा'कडून अयोध्य, लखनऊ, वाराणसी यांसहीत राज्यातील ४६ रेल्वे स्टेशन उडवण्याची धमकी देण्यात आल्याची माहिती देण्यात आलीय.

मिळालेल्या माहितीनुसार, हापुड रेल्वे स्टेशन अधीक्षकांना टपालाद्वारे एक पत्रं मिळालंय. यामध्ये, 'लष्कर ए तोयबा'कडून २६ नोव्हेंबर रोजी उत्तर प्रदेशातील हापूर, गोरखपूर, लखनऊ, खुर्जा, अलीगढ, कानपूर, तुंडला, बरेली आणि मुरादाबाद ही रेल्वे स्थानकं बॉम्बस्फोटात उडवली जातील अशी धमकी देण्यात आलीय. तसंच ६ डिसेंबर रोजी प्रयागराज, अयोध्या, हरिद्वार, उज्जैन, मुंबई आणि अहमदाबादची मंदिरं बॉम्बनं उडवण्यात येतील, असा उल्लेखही या पत्रात आहे.

## वंचितांना अधिकार मिळवून देण्यासाठी जागृती आवश्यक : वरिष्ठ न्यायमूर्ती ए.ए. सय्यद

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

संविधानाने सर्वांना समान हक्क दिले आहेत. तरीही समाजात अजूनही मागास-लेले, वंचित घटक आहेत. त्यांना त्यांचे अधिकार मिळवून देण्यासाठी जागृती आवश्यक असल्याचे प्रतिपादन वरिष्ठ न्यायमूर्ती,उच्च न्यायालय, मुंबई तथा कार्यकारी अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई श्री.ए.ए.सय्यद यांनी आज नागोठणे येथे केले.



महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई, रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि रायगड जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबीर व शासकीय सेवा, योजनांचा महामेळावा रोहा तालुक्यातील नागोठणे येथील रिलायन्स पेट्रोकेमिकल्स टाउनशिप मधील बालगंधर्व रंगभवन सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर,महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई चे सदस्य सचिव श्री.दिनेश सुराणा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती विभा इंगळे, न्यायाधीश अशोककुमार भिलारे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, जिल्हा सरकारी वकील भूषण साळवी, सर्व प्रांताधिकारी, तहसिलदार, विविध शासकीय विभागांचे कार्यालयप्रमुख, तालुका बार कौन्सिलचे अध्यक्ष, वकील, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

न्यायमूर्ती ए.ए.सय्यद पुढे म्हणाले, देशहितासाठी समाजातील सर्वच स्तरांची सर्वांगीण प्रगती होणे आवश्यक आहे. प्रत्येक वंचित घटकास, मागासलेल्या व्यक्तीस त्याच्या अधिकाराची, हक्काची जाणीव होणे गरजेचे आहे. त्यासाठी जनजागृती करणे महत्त्वाचे असून यासाठीच तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर विधी सेवा प्राधिकरण कार्य करीत आहे. वंचितांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण प्रयत्नशील आहेत. आजच्या या विधी सेवा महाशिबीर तसेच शासकीय सेवा व योजनांच्या महामेळाव्याच्या माध्यमातून जनतेत, वंचित घटकांत त्यांचे हक्क,कर्तव्य तसेच जबाबदारी याबाबत जनजागृतीचा प्रयत्न केला जात आहे. अशा शिबिरांच्या माध्यमातून देशभरातून आतापर्यंत दररोज ४० लाख लोकांपर्यंत विधी सेवांची तसेच विविध शासकीय योजनांची सेवांची माहिती जनतेपर्यंत पोहोचत आहे. हे काम असेच अविरत सुरू राहील, असेही ते शेवटी म्हणाले. या कार्यक्रमासाठी .../२

## घरफोडया करणाऱ्या अट्टल आरोपीस कर्जत पोलीसांनी ठोकल्या बेडया

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कर्जत मुद्रे येथे झालेल्या घरफोडीप्रकरणी दोन अट्टल चोरट्यांना जेरबंद करत, चोरीला गेलेले सोन्याचे दागिने व मोबाईल हस्तगत करण्यात कर्जत पोलिसांना यश आले आहे. अटक केलेल्या चोरट्यांपैकी एकावर ९ तर दुसऱ्यावर ३ घरफोडी, चोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

१३ ऑक्टोबर रोजी ११ वाजण्याच्या दरम्यान रेव्हेन्यू कॉलनी, मुद्रे कर्जत येथे राहणारे रंजित धोंडीबा चव्हाण व त्यांचे कुटुंब हे घरी नव्हते. याचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने त्यांच्या फ्लॅटच्या दरवाजाचे कडी-कुलूप तोडून फ्लॅटमध्ये प्रवेश केला आणि बेडरुमच्या कपाटात ठेवलेले पत्नीचे सोन्याचे दागिने व चार्जिंगला लावलेला मोबाईल असा एकूण १ लाख ४४ हजारांचा ऐवज घरफोडी करुन चोरुन नेला होता. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर, याप्रकरणी घरफोडी, चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सद-रचा गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याबाबत पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की यांनी गुन्हे प्रकटीकरण पथक कर्जत पोलीस ठाणे यांना आदेश केले होते. त्याप्रमाणे चोरीस .../२



## चिंचोडी पाटील विद्यालयाला नवसंजीवनी

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे मानले आभार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुर्गम भागात असलेल्या विद्यालयाला नवसंजीवनी दिल्याबाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे चिंचोडी पाटील येथील ग्रामस्थ व विद्यालयाच्यावतीने आभार मानण्यात आले.



अहमदनगर जिल्ह्यातील चिंचोडी पाटील गावामध्ये १९६० साली रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय सुरु झाले. या दीर्घकाळात या विद्यालयाची इमारत अत्यंत जीर्ण झाल्याने पावसाळ्यात छप्पर गळती व इतर कारणाने विद्यार्थी व शिक्षकांना शिक्षणात खूप गैरसोय होत होती. त्यामुळे नवीन इमारत बांधण्याचा दृष्टिकोनातून विद्यालय व स्कुल कमिटीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांना मदतीसाठी आवाहन केले होते. त्या अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आर्थिक मदत करून या विद्यालयाला नवसंजीवनी दिली असून या इमारतीच्या बांधकामाचे काम प्रगतीपथावर आहे.

त्याबद्दल स्कुल कमिटीचे चेअरमन आबासाहेब कोकाटे, व्यवस्थापन समिती अध्यक्ष आप्पासाहेब पवार, सदस्य साहेबराव कोकाटे, मुख्याध्यापक भागवत राठोड, शिक्षक डी. एस. पाचारणे, यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन आभार व्यक्त केले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, अनिल कोकाटे आदी उपस्थित होते.

## सुरेश पोसतांडेल यांची महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड

**दै.रायगड नगरी । उरण**

कर्तव्यदक्ष व प्रामाणिकपणे काम करणारे, स्वच्छ चारित्र्य संपन्न म्हणून सर्वत्र सुरेश पोसतांडेल यांची ओळख असून सुरेश पोसतांडेल हे उरण नगर परिषद येथे लेखाधिकारी पदावर काम करीत आहेत. ते नगर परिषद /नगर पंचायतीच्या कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्याचे काम करत असून त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांची निवड महाराष्ट्र राज्य नगरपरिषद / नगरपंचायत कर्मचारी /संवर्ग कर्मचारी संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदी करण्यात आली आहे.

शेगाव येथे झालेल्या सभासदांच्या सर्वसाधारण सभेत कर्तव्य दक्ष कर्मचारी सुरेश पोसतांडेल यांची महाराष्ट्र नगर परिषद /नगर पंचायती कर्मचारी /संवर्ग कर्मचारी या शासन मान्यताप्राप्त संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी त्यांची नियुक्ती झाली आहे.तसेच प्रदेश उपाध्यक्ष पदी प्रदीप रावनकर, प्रदेश सरचिटणीस पदी रामेश्वर वाघमारे व प्रदेश कोषाध्यक्ष अनिल पवार यांची नेमणूक झाली आहे.

नवनियुक्त या सर्व पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्रातील सर्व नगर परिषद व नगर पंचायत मधील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. अनेक जणांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून तर काही जणांनी त्यांना सोशल मीडिया द्वारे पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## मतदार नोंदणीसाठी महिलांनी पुढे यावे : श्रीकांत देशपांडे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

संपूर्ण राज्यात आजपासून विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून या मोहिमेत महिलांचा सहभाग वाढविण्याची गरज असून जास्तीत जास्त महिला नवमतदारांची नोंदणी व्हावी, यासाठी निवडणूक विभाग आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी समन्वयाने काम करावे व शेवटच्या महिलांपर्यंत पोहोचून त्यांना मतदार यादीत नाव नोंदणी करण्यासाठी उद्युक्त करावे, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी आज महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या अधिकाऱ्यांना केले.

दिनांक १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२१ या कालावधीत राज्यात होणाऱ्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाला जास्तीत जास्त प्रसिद्धी देण्याच्या उद्देशाने ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, या बैठकीस महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.हेमंत वसेकर, सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, राज्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचे स्वीप सल्लागार दिलीप शिंदे आदी उपस्थित होते.

श्री.देशपांडे म्हणाले की, जास्तीत जास्त महिलांची मतदार नोंदणी करण्याकरिता त्यांच्यापर्यंत संदेश घेऊन जाणे आवश्यक आहे. नवविवाहितेचे नाव तिच्या सासरकडील मतदार यादीत होण्यासाठी प्रयत्न करावे, यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करण्यात यावा. मतदार यादीत महिलांना नाव नोंदणी करावयाची आहे, ही माहिती जर एका महिलेपर्यंत गेली तरी ती सर्व कुटुंबापर्यंत जाते. नाव नोंदणीची प्रक्रिया अत्यंत सोपी करण्यात आली आहे. दिनांक १३ व १४ नोव्हेंबर आणि २६ व २७ नोव्हेंबर २०२१ रोजी विशेष मतदार नोंदणी .../२

## दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर सिडकोने उपलब्ध करून दिली सुवर्णसंधी

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

या वर्षीच्या दिवाळीचा गोडवा अधिक वाढवण्यासाठी सिडको महामंडळाने विविध योजनांतर्गत, नवी मुंबईच्या विविध नोडमधील सामाजिक उद्देशाचे तसेच निवासी, वाणिज्यिक, निवासी तथा वाणिज्यिक भूखंड आणि वाणिज्यिक गाळ्यांच्या विक्रीची भव्य योजना आणली आहे. या योजनेंतर्गत नवी मुंबईच्या खारघर, पनवेल, पुष्पक नगर नोडमधील भूखंड आणि नवी मुंबईतील रेल्वे स्थानक संकुलांतील व सिडकोच्या गृहनिर्माण संकुलांतील वाणिज्यिक गाळे विक्रीकरिता उपलब्ध




करून देण्यात येणार आहेत. यात सिडकोच्या सामाजिक सेवा उपक्रमांतर्गत वैद्यकीय महाविद्यालय आणि विद्यार्थी वसतिगृहासोबतच निवासी, वाणिज्यिक, निवासी तथा वाणिज्यिक वापराकरिता लहान व मध्य आकाराचे भूखंड उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

कोविडोत्तर काळात नवी मुंबईतील बांधकाम क्षेत्रासह अर्थव्यवस्थेला चालना देण्याकरिता सिडकोकडून सातत्याने भूखंड विक्रीच्या योजना आणल्या जात असून, सदर योजनाही सिडकोच्या या प्रयत्नांचाच एक भाग आहे. सिडकोकडून नवी मुंबईचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विविध उद्देशांकरिता असलेल्या भूखंड सातत्याने विक्रीकरिता उपलब्ध करून दिले जातात. त्याचप्रमाणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटातील नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण .../२

# दिलासा द्या; छळू नका!

संपूर्ण करोना काळात महामुंबईची जीवनवाहिनी असणाऱ्या लोकलप्रवासावर रेल्वे खाते आणि राज्य सरकार यांनी मिळून जी अतिरेकी बंधने घातली; ती आता करोना आटोक्यात आल्यानंतरही काढून टाकण्यात कमालीची दिरंगाई होते आहे. आजही विविध स्पर्धा परीक्षांना बसणारे परीक्षार्थी, १८ वर्षे पुरे न झालेले विद्यार्थी आणि रेल्वेसेवेवर मदार असणारे दिव्यांग प्रवासी यांना मुक्तपणे रेल्वेप्रवास करता येत नाही. आता दोन्ही लस झालेल्यांना एक दिवसाचे तिकीट घेऊन प्रवास करता येणार असला तरी या निर्णयालाही खूपच उशीर झाला आहे. आता तो तरी नीट राबवायला हवा. आजवर ज्यांना केवळ काही कामासाठी एकदा किंवा दोनदाच प्रवास करायचा होता; अशांनाही पूर्ण महिन्याचा पास घ्यायला लावून रेल्वे खात्याने अशा लाखो प्रवाशांवर मोठा अन्याय केला आहे. गेल्या काही महिन्यांत सातत्याने पेट्रोल आणि डिझेलचे भाव वाढत आहेत. अशावेळी, रेल्वे स्टेशनांवर अधिकाधिक कर्मचाऱ्यांची कुमक ठेवून प्रवाशांना लोकलने तसेच मुंबई–पुणे आणि मुंबई–नाशिक या दरम्यान दररोज धावणाऱ्या गाड्यांमधून सुखरूप प्रवास करण्याची व्यवस्था रेल्वे खात्याने राज्य सरकारच्या मदतीने करावयास हवी होती. तशी मदत करण्यात दोघेही कमी पडले आहेत. निदान आता तरी या दोघांनी परस्परांशी अधिक समन्वय ठेवून महामुंबईतील लक्षावधी प्रवाशांचा त्रास कमी होईल, याकडे लक्ष द्यावे. लोकल प्रवासावर बंधने असल्याने महामुंबईतील रोजचे ५० ते ७० लाख प्रवासी करोना काळात एसटी, बेस्ट, इतर महापालिकांच्या बससेवा तसेच रिक्षा व इतर खासगी वाहनांकडे वळले होते. यात पैसा, श्रम आणि वेळ हे सारेच जात होते. शिवाय, आरोग्य खात्याला अपेक्षित असणाऱ्या शारीरिक अंतराचा फज्जा उडत होता, तो वेगळाच. अशावेळी, एक लस घेतलेल्या नागरिकांना लोकल प्रवास मोकळा करण्याची गरज होती. ही बाब हाताळणारा राज्य सरकारचा आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि पश्चिम तसेच मध्य रेल्वेचे उच्चाधिकारी यांच्यात आवश्यक तितका सुसंवाद नव्हता. त्यामुळेच, निर्णयही गतिमान नव्हते. त्याचा फटका कष्टकरी, कर्मचारी आणि इतर रेल्वे प्रवाशांना अजूनही बसतो आहे. अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना लस टोचली नसेल तरी रेल्वेप्रवास करता येत होता. आता हा नियम बदलून अचानक केवळ पूर्ण लसीकरण झालेल्यांनाच रेल्वे प्रवास करता येईल, असा करण्यात आला आहे. मध्यंतरी, पहिली लस मिळालेल्या हजारो मुंबईकरांना दुसरी लस मात्र मुदत उलटूनही मिळत नव्हती. अनेकजण तिष्ठत होते. त्यात हे कर्मचारीही होते. अशावेळी, एक लस घेतलेल्या आवश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना लोकल प्रवासाची मुभा देण्यास काहीच हरकत नव्हती. याशिवाय, दोन्ही लसी घेतलेले आणि कामासाठी रोज प्रवास करावे लागणारे हजारो प्रवासी तीन किंवा सहा महिन्यांचा पास घेण्यासही तयार होते. करोनापूर्व काळात रेल्वेने थेट एका वर्षाचा लोकल प्रवास पासही जारी करण्यास सुरुवात केली होती. मग स्टेशनांवर पुन्हा पुन्हा गर्दी होण्यापेक्षा हे दीर्घ मुदतीचे पास रेल्वेने याआधीच द्यायला हवे होते. महाराष्ट्रात केवळ महामुंबईतच नव्हे तर पुणे–लोणावळा, पुणे–दौंड, मुंबई–इगतपुरी, नाशिक–मनमाड, नाशिक–भुसावळ, कोल्हापूर–मिरज, नागपूर–वर्धा या व इतरही अनेक शहरांच्या दरम्यान रोज रेल्वेने प्रवास करणारे लाखो प्रवासी आहेत. या साऱ्यांना लस घेतलेली असो अथवा नसो; दीर्घ मुदतीचे पास न देऊन रेल्वे खात्याने मोठाच अन्याय केला आहे. आता तरी तो तातडीने सर्वत्र दूर होईल, अशी अपेक्षा आहे. करोनावर विजय मिळवत असताना बेफिकिरी उपयोगाची नाही, हे जितके खरे; तितकेच नियमांचे व कागदी घोड्यांचे जंगल उभे करून नागरिकांना छळणे, हेही योग्य नाही. रेल्वे आणि राज्य सरकारला इतकीच काळजी होती तर दोघांनी समन्वयाने सर्व रेल्वे स्टेशनांवर अहोरात्र चालणारी लशीकरण केंद्रे उघडायला हवी होती. म्हणजे, रोज पोटासाठी प्रवास कराव्या लागणाऱ्या लाखो कष्टकऱ्यांवर 'टोचली का लस?' असा दंडुका उभारून स्टेशनांतून घालवून द्यावे लागले नसते. एकवेळच्या प्रवासासाठी 'सिंगल तिकीट' देण्याचा निर्णय जाहीर करताना राज्य सरकारने कारण मोठे विचित्र दिले आहे. 'सिंगल तिकीट' मिळत नसल्याने 'विदाऊट तिकीट' प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढली आणि त्यात लस न घेतलेलेही जाऊ लागले. यातून रेल्वेचे नुकसान आणि करोनाचा धोका असे दोन्ही वाढण्याची भीती आहे, असे राज्य सरकारने म्हटले आहे. इतकी साधी गोष्ट कळायला सरकारला इतके महिने लागावेत, हे आश्चर्य आहे. मुंबई हेच महाराष्ट्र आणि देशाच्या आर्थिक विकासाचे खरे इंजिन आहे. तेव्हा आता तरी राज्य सरकार व रेल्वे खाते यांनी रेल्वे प्रवाशांचा चालविलेला संयुक्त छळप्रयोग पूर्णपणे थांबवावा आणि एक लस झालेल्यांना त्वरित दुसरी लस देऊन रेल्वेची दारे शाळकरी मुलांसहित सर्वांना पुरती मोकळी करावीत.

## नागरी संरक्षण स्वयंसेवकांच्या नोंदणी व पुनर्नोंदणीबाबत आवाहन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

नागरी संरक्षण दलाने आतापर्यंत अनेक नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीच्या वेळी राज्य व राज्याबाहेर विमोचन व मदतकार्य केलेले आहे. नागरी संरक्षण दलाची व्याप्ती नागरी संरक्षण शहरापुरती मर्यादित न ठेवता वाढविण्याचे धोरण आहे. आपत्कालीन उपाययोजनेच्या दृष्टीकोनातून मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, रायगड व पालघर या सहा नागरी संरक्षण जिल्ह्यांमध्ये नागरी संरक्षण स्वयंसेवकांची नोंदणी व पुनर्नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहिती नागरी संरक्षण संचालनालयाचे संचालक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

नागरी संरक्षण दलामध्ये सामील होऊन देशसेवा करण्याची इच्छा असलेल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात नोंदणी व पुनर्नोंदणी करावी असे आव–ाहन नागरी संरक्षण संचालनालयामार्फत करण्यात आले आहे. राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, रायगड व पालघर या नागरी संरक्षण जिल्ह्यांमध्ये नागरी संरक्षण स्वयंसेवकांची नोंदणी व पुनर्नोंदणी प्रक्रिया पुन्हा सुरु केली आहे. तरी, ज्या नागरिकांना नागरी संरक्षण दलामध्ये स्वंयसेवक म्हणून सदस्य व्हावयाचे आहे त्यांनी या विभागाची वेबसाईट http://maharashtracdhg.gov.in वर भेट द्यावी नागरी संरक्षण स्वंयसेवक नोंदणी व पुनर्नोंदणी फॉर्मस् दिलेल्या अटी, शर्तीसह डाऊनलोड करुन घ्यावेत. नोंदणी / पुनर्नोंदणी फॉर्म भरुन आपल्या क्षेत्रातील संबंधित नागरी संरक्षण कार्यालयाशी संपर्क साधून स्वतः सादर करावेत आणि पुढील प्रक्रियेबाबतची माहिती घ्यावी.

स्वयंसेवक म्हणून आपले योगदान देशसेवेसाठी द्यावे, असे आवाहन नागरी संरक्षण संचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

## अभ्यंग स्नानानंतर नरकासुराचे प्रतीक असलेले चिराटे फळ बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल

**दै.रायगड नगरी । मुरुड**

आश्विन कृष्ण चतुर्दशीस नरक चतुर्दशी असेही म्हण–तात. दिवाळीच्या दिवसांतील हा एक सण आहे. या सणाशी संबंधित एक आख्यायिका प्रचलित आहे. पूर्वी प्राग्ज्योतिषपूर येथे नरकासुर या नावाचा एक बलाढ्य असुर राज्य करत होता. हा दुष्ट राक्षस स्त्रियांना पीडा देऊ लागला. त्याने जिंकून आणलेल्या सोळा सहस्र उपवर राजकन्यांना कारागृहात कोंडून ठेवले आणि त्यांच्याशी विवाह करण्याचा बेत केला. त्यामुळे जिकडेतिकडे हाहाःकार उडाला.

श्रीकृष्णाला हे वृत्त समजताच सत्यभामेसह त्याने नरकासुरावर आक्रमण केले आणि त्याला ठार करून सर्व राजकन्यांना मुक्त केले. मरतांना नरकासुराने कृष्णाकडे वर मागितला, 'आजच्या तिथीला जो मंगलस्नान करील, त्याला नरकाची पीडा होऊ नये.'

कृष्णाने तसा वर त्याला दिला. त्यामुळे आश्विन वद्य चतुर्दशी ही 'नरक चतुर्दशी' मानली जाऊ लागली आणि लोक त्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करू लागले. पहाटे अभ्यंगस्नानानंतर घरातील स्त्रियांनी आरती केल्यानंतर पायाने चिरांटे नावाचे फळ चिरडून नरकासुराचा वध केल्याचे प्रतीक म्हणून वापरण्याची पूर्वापार परंपरा आहे,

मुरुड तालुक्यातील जंगलात हे फळ मुबलक प्रमाणात उपलब्ध असते, नरक चतुर्दशीच्या दिवशी या फळाला प्रचंड मागणी असल्याने आदिवासी समाजातील महिला , मुले हि फळे विक्रीसाठी बाजारात आणतात, साधारण दहा रुपयांना दोन फळे याप्रमाणे विक्री केली जाते यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी थोड्याफार प्रमाणात हातभार लागतो .

## म्हसळ्यातील बचत गटानी तयार केलेल्या खाद्यपदार्थांची विक्री व प्रदर्शन करुन केली व्यापारी सुरुवात

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा शहरातील अत्यंत मध्यवर्ती ग्रामीण रुग्णालय म्हसळा च्या प्रांगणात स्वदेस फाउंडेशन व पंचायत समिती (एम एस आर एल एम) म्हसळा च्या संयुक्त विद्यमाने महिला स्वयंसहाय्यता बचत गटांनी तयार केलेल्या प्रक्रियायुक्त पदार्थांचे प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले असून महिला स्वयंसहाय्य– ता समूहाचे आर्थिक उत्पन्न वाढावे या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात एकूण नऊ बचत गट सहभागी झाले असून या गटांनी दिवाळी, फराळ,पापड, लोणचे,मसाले अशा पदार्थां चा समावेश होता.याप्रसंगी म्हसळा पंचायत समितीच्या सभापती श्रीमती छाया म्हात्रे, उपसभापती श्री संदिप चाचले गटविकास अधिकारी वाय. एन.प्रभे, ग्रामीण रुग्णालय आरोग्य अधिकारी डॉक्टर महेश मेहता, सांबरे , माजी सभापती महादेव पाटील तसेच स्वदेस फाउंडेशन चे संचालक राहुल कटारिया उपसंचालक तुषार इनामदार, प्रसाद पाटील तालुकाव्यवस्थापक शिवतेज ढऊळ व रवींद्र राऊत या मान्यवरांनी तसेच तालुक्यातील इतर प्रतिष्ठित व्यक्तींनी या प्रदर्शनास भेट दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचायत समिती म्हसळा (एम एस आर एल एम) अभियानाचे तालुका व्यवस्थापक श्री आबा साळवे,प्रभाग समन्व यक गोरठे,स्वदेस फाउंडेशन वरिष्ठ समन्वय क अमोल पाटील व शुभदा सुतार यांनी विशेष परिश्रम घेतले.या उपक्रमाचे तालुक्यातून सर्वत्र कौतुक होत असुन अशी संधी मोठ्या प्रमाणात मिळावी अशी अपेक्षा स्वयं सहाय्यता समुहांकडुन होत आहे.

## सुकेळी-वेताळवाडी येथील कबड्डी स्पर्धेत जय वाघोबा खैरवाडी संघ विजेता

**दै.रायगड नगरी । वाकण**



नागोठण्याजवळील सुकेळी –वेताळवाडी येथील श्री.जय हनुमान क्रिडा मंडळाने आयोजित केलेल्या आदिवासी समाजातील ५० किलो वजनी गटातील कबड्डीच्या अंतिम सामन्यात सुकेळी खैरवाडी येथील जय वाघोबा संघाने जय हनुमान धाईरवाडी या संघांचा पराभव करत कबड्डी चषकावर आपले नाव कोरले.

सुकेळी वेताळवाडी येथे शनिवार (दि.३०) रोजी सायंकाळी ७ वा. ऐनघर विभाग बेरोजगार संघटनेचे उपाध्यक्ष सतिष सुटे व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन झाले. या कबड्डी स्पर्धेत रायगड जिल्ह्यातुन ८५ संघ सहभागी झाले होते. या सामन्यांचा थरार दुस–या दिवशी (दि. ३१) रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू होता. यावेळी मोठ्या प्रमाणात क्रिडाप्रेमींनी कबड्डी सामन्यांचा आंनद लुटला. या स्पर्धेच्या अटितटीच्या थरारक अंतिम सामन्यात जय वाघोबा संघाने ५–३ अशी लढत देत धाईरवाडी संघांचा पराभव करत प्रथम क्रमांकाचे रोख रक्कम रु.७००० व आकर्षक चषक मिळवले. तर जय हनुमान धाईरवाडी संघाला उपविजेत्या पदावर समाधान मानावे लागले. तर पेण तालुक्यातील बोरीचा माळ (अ) व बोरीचा माळ (ब) या एकाच गावातील दोन्हीं संघांना अनुक्रमे तृतिय व चतुर्थ क्रमांक पटकाविण्यात यश प्राप्त झाले. या सामन्यात सामनावीर म्हणून खैरवाडी संघांचा आकाश वारगुडे, उत्कृष्ट पकड उमेश हंबीर, तर उत्कृष्ट चढाई म्हणुन समीर दोरे या खेळाडूंना चषक देऊन गौरविण्यात आले.

या बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाला ऐनघर ग्रामपंचायतीचे सदस्य मनोहरभाई सुटे, ऐनघर विभाग बेरोजगार संघटनेचे उपाध्यक्ष सतिष सुटे, माजी सरपंच गणपत निरगुडे, माजी सदस्य अंबाजी शिद, काशिराम वारगुडे, मालु शिद, काशिराम हंबीर, मधुकर हंबीर, परश–ुराम वारगुडे, रमेश वारगुडे, पांडुरंग निरगुडे,धर्मा वारगुडे,येसुराम वारगुडे, मंगेश हंबीर,राजु वारगुडे, महेश निरगुडे, अजय शिद, अनिल वारगुडे, संजय शिद तसेच जय हनुमान क्रिडा मंडळाचे सर्व सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## वंचितांना अधिकार मिळवून देण्यासाठी जागृती आवश्यक

जिल्हाधिकारी कार्यालय व विविध शासकीय विभागांनी केलेल्या उत्कृष्ट नियोजनाबाबत न्यायमूर्ती ए.ए. सय्यद यांनी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे विशेष कौतुकही केले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी आपल्या मनोगतातून प्रशासनाने वंचितांना विविध शासकीय दाखले देण्यासाठी घेतलेल्या शिबिरांबाबत, जिल्ह्यात राबविण्यात येत असलेली लसीकरण मोहीम, ऑक्सिजन निर्मितीतील रायगड जिल्ह्याचे महत्वपूर्ण योगदान, कोविडच्या तिसऱ्या लाटेची जिल्हा प्रशासनाने केलेली पूर्वतयारी यासह रायगड जिल्ह्याच्या वैविध्यपूर्ण वैशिष्ट्यांची माहिती दिली. त्याचप्रमाणे येत्या काळातही लोकाभिमुख, पारदर्शी, जनतेला हितकारक असे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रोहा प्रांताधिकारी डॉ. यशवंत माने, तहसिलदार कविता जाधव, प्रांताधिकारी अमित शेडगे, तहसिलदार सचिन गोसावी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के–पाटील, तहसिलदार विशाल दौंडकर, तहसिलदार सचिन शेजाळ, विविध शासकीय विभागांचे कार्यालयप्रमुख व त्यांचे कर्मचारी, रिलायन्सचे वरिष्ठ अध्यक्ष अविनाश श्रीखंडे,अध्यक्ष शशांक गोयल, उपाध्यक्ष चेतन वाळंज तसेच रिलायन्स इंडस्ट्रीज, नागोठणे, वरिष्ठ व्यवस्थापक रमेश धनावडे, अजिंक्य पाटील, श्रीकांत राजहंस त्याचप्रमाणे स्थानिक प्रशासन, पोलीस प्रशासन यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

## घरफोडया करणाऱ्या अट्टल आरोपीस कर्जत पोलीसांनी ठोकल्या बेडया

गेलेला मोबाईल व तांत्रिक पुराव्यांची मदत घेऊन शफीक अब्दुल शेख (वय ४०, रा.घुंगट नगर, भिवंडी, जि.ठाणे) याला भिवंडी येथून ताब्यात घेण्यात कर्जत पोलिसांना यश आले. शफीक शेखकडे चौकशी केली असता त्याने एकट्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली असून, चोरलेले सोन्याचे दागिने हे साथीदार मित्र लवकुश पापाजी गुप्ता (वय ३१, रा. न्यू बालाजी नगर, अंबरनाथ) यास सोनाराकडे विकण्यासाठी दिल्याचेही सांगितले. पोलिसांनी कोणतीही वेळ न घालवता लवकुश यास अंबरनाथ येथून ताब्यात घेऊन त्याच्याकडून विक्रीसाठी दिलेले दागिने सोनाराकडून जप्त करण्यात आले आहेत. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून, चोरीला गेलेले सोन्याचे दागिने व मोबाईल असा १०० टक्के मुद्देमाल जप्त करण्यात कर्जत पोलिसांना यश आले आहे. अटक केलेल्या चोरांपैकी शफीक अब्दुल शेख याच्यावर रबाळे, भिवंडी, ठाणे येथे एकूण ९ घरफोडीचे गुन्हे दाखल असून लवकुश पापाजी गुप्ता याच्यावर ३ चोरीचे गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या दोघांचीही रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. दरम्यान, हा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी खालापूर संजय शुक्ला, कर्जत पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस उपनिरीक्षक महेश धोंडे, पोलीस हवालदार सुभाष पाटील, स्वप्नील येरुणकर, पोलीस अंमलदार भूषण चौधरी, गणेश पाटील, अश्रुबा बेद्रे यांनी ही यशस्वी कामगिरी केली.

## मतदार नोंदणीसाठी महिलांनी पुढे यावे : श्रीकांत देशपांडे

शिबिरे घेण्यात येत असून दिनांक १६ नोव्हेंबर २०२१ रोजी विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहे. या ग्रामसभेत मतदार यादीचे वाचन करण्यात येणार असल्याची माहिती श्री.देशपांडे यांनी दिली.

राज्यातील नवमतदार, तृतीयपंथी तसेच दिव्यांगांचे नाव मतदार यादीत समाविष्ठ होण्यासाठी आवश्यक ती लागणारी सर्व मदत उमेदमधील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने पूर्ण केली जाईल, अशी ग्वाही महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.वसेकर यांनी यावेळी दिली.

## दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर सिडकोने उपलब्ध करून दिली सुवर्णसंधी

व्हावे याकरिता सिडकोकडून आपल्या गृहनिर्माण योजनांद्वारे परवडणाऱ्या दरातील घरे (सदनिका) सातत्याने उपलब्ध करून दिली जातात. या योजनेद्वारे सिडकोने लहान व मध्यम आकारांचे भूखंड उपलब्ध करून दिले असून या भूखंडांची मालकी निर्वेध (क्लिअर टायटल) आहे. प्रचलित दरांपेक्षा या भूखंडांचे दर तुलनेने कमी असून नवी मुंबईतील सुविकसित नोडमध्ये हे भूखंड स्थित आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नवी मुंबईमध्ये आपल्या स्वप्नातील घर साकारण्याची तर छोट्या व मध्यम विकासकांना आपल्या स्वप्नातील प्रकल्प विकसित करण्याची संधी याद्वारे उपलब्ध होणार आहे. या योजनेतील वाणिज्यिक गाळे हे नवी मुंबईतील मोक्याच्या ठिकाणी आणि सुप्रस्थापित बाजारात असल्याने व्यावसायिकांना व्यवसाय वृद्धिची व गुंतवणूकदारांना गुंतवणूकीची संधी उत्तम संधी उपलब्ध होणार आहे. नवी मुंबईच्या सुविकसित परिसरात पुनर्विक्रीद्वारे (रिसेल) वाणिज्यिक गाळे मिळणे दुरापास्त असल्याने व्यावसायिकांना व सर्वसामान्य नागरिकांना या योजनेद्वारे वाणिज्यिक गाळे मिळण्याची सुसंधी प्राप्त होणार आहे. त्याचप्रमाणे सामाजिक उद्देशांकरिता भूखंड उपलब्ध करून देत सिडकोने नेहमीप्रमाणे भौतिक आणि सामाजिक विकासातील समतोलही साधला आहे. नवी मुंबईला उपनगरी रेल्वे, महामार्ग व अंतर्गत रस्त्यांचे जाळे यांमुळे उत्तम संधानता (कनेक्टिव्हिटी) लाभली आहे. नजीकच्या काळात साकार होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे नवी मुंबई थेट जगाला जोडली जाणार आहे. तसेच सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेल्या मेट्रो प्रकल्पामुळे नवी मुंबईतील सार्वजनिक परिवहन सेवा अधिक सक्षम होणार आहे. यामुळे सदर योजनेतील भूखंडांना आणि वाणिज्यिक गाळ्यांना लाभलेली सुसंधानता हा विकासक आणि व्यावसायिकांकरिता एक अतिरिक्त लाभ ठरणार आहे. सदर योजना या ई–निविदा व ई–लिलाव पद्धीतीने पार पडणार आहेत. या योजनांकरिता निविदाकारांची नोंदणी, अर्ज सादर करणे, अनामत रकमेचा भरणा करणे, बंद निविदा सादर करणे, ई–लिलाव प्रक्रिया व योजना पुस्तिका इ. सर्व तपशील सिडकोच्या https://eauction.cidcoindia.com या ई–लिलाव संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. कोविड–१९ पश्चात बांधकाम क्षेत्रासह अन्य क्षेत्रांत उभारी आणण्याकरिता सिडकोच्या अन्य योजनांप्रमाणे या योजनाही उपयुक्त ठरणार आहेत. तरी अधिकाधिक बांधकाम व्यावसायिक, विकासक यांसह सर्वसामान्य नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे.

## कळंबोलीतील शिक्षिका अंजली मढवी सेवानिवृत्त



**दै.रायगड नगरी । कळंबोली**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील मराठी प्राथमिक विद्यालयातील सहाय्यक शिक्षिका अंजली रोहिदास मढवी या आपल्या २८ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीचा निरोप समारंभ कळंबोली विद्या संकुलातील सहकारी वर्गाने आयोजित केला होता. यावेळी त्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह व आदी भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांनी केलेल्या प्रदीर्घ शैक्षणिक कार्याचा आलेख सहकारी वर्गाने मांडून त्यांच्या प्रती आदर व्यक्त केला.

अंजली रोहिदास मढवी यांनी आपल्या शैक्षणिक कार्याची सुरुवात १९९३ पासून सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोलीतील मराठी प्राथमिक विद्यालयात सुरू केली. गेल्या २८ वर्षात त्यांनी अनेक विद्यार्थी आपल्या शैक्षणिक कार्याने घडवून सशक्त व कणखर भावी नागरिक बनवण्यासाठी अपार मेहनत घेतली आहे .त्यांचे बुद्धिकौशल्य व शिक्षणाची हातोटी ही विद्यार्थी वर्गाच्या स्मरणात राहिली असून त्यांनी दिलेली शिकवण आजही विद्यार्थीवर्ग त्यांच्या सामाजिक जीवनात आचरणात आणीत आहेत. त्यांनी शिकवलेले विद्यार्थी आज शासकीय व खाजगी क्षेत्रात उच्चपदस्थ पदावर कार्यरत आहेत त्यांच्या प्रदीर्घ सेवेनंतर त्याच्या सेवानिवृत्तीचा निरोप समारंभ कार्यक्रम कळंबोलीतील मराठी प्राथमिक विद्यालयाच्या सभागृहात भव्य दिव्य स्वरुपात आयोजित करण्यात आला होता. शिक्षक वर्गाने विविध कार्यक्रम आयोजित करून त्यांचा यथोचित सन्मान केला. ५८ दिव्यांच्या ज्योतीने त्यांना सुहासिनीं कडून ओवाळण्यात आले. चॉकलेटचा हार तसेच विविध नाण्यांचा हार त्यांना कर्मचारी वर्गाकडून परिधान करण्यात आला. शैक्षणिक कार्य करीत असताना विद्यार्थी वर्गाला व्यसनमुक्ती बेटी, बचाव बेटी पढाव, वृक्ष लागवड, पाणी आडवा पाणी जिरवा, आई–वडिलांचा सन्मान, सामाजिक जीवनातील आपली जबाबदारी, पाढे पाठांतर, अशा विविध गुण पैलूंचा पगडा त्यांनी प्रत्यक्षात विद्यार्थी वर्गात रुजवला. त्यांच्या सेवानिवृत्तीसाठी त्यांना दीर्घायुष्य लाभो त्यांच्या जीवनात आनंद बहरत राहो यासाठी कळंबोलीतील विविध विभागातील कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## वाघोशी विद्यालयात पर्यावरणस्नेही आकाश कंदील बनविणे कार्यशाळा संपन्न

### शिक्षक व विद्यार्थ्यांचा पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

दिवाळी निमित्त सुधागड तालुक्यातील माध्यमिक विद्यालय वाघोशी येथे नुकतेच पर्यावरणस्नेही आकाश कंदील बनविणे कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने आकर्षक आकाश कंदील बनविले आणि पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश दिला.

या कार्यशाळेत इयत्ता ८ वी व ९ वीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. बनविलेले काही आकाश कंदील शाळेत ठेवण्यात आले तर काही आकाश कंदील विद्यार्थ्यांनी आपल्या घरी नेले. या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक राजेश गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली नरेश शेडगे, सुजाता गोळे, विकास निकम, संतोष गायकवाड, मयुर देशमुख, सुधीर देशमुख, शिरीष मोरे यांनी मेहनत घेतली. तसेच सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. वाघोशी विद्यालयात नेहमी नवोपक्रम राबविले जातात.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## बाजारात रेडिमेड किल्ले दाखल बच्चे कंपनींना अधिक पसंत

**दै.रायगड नगरी । खांब- रोहा**

दिवाळी सणानिमित्त बच्चे कंपनीसाठी रेडिमेड किल्ले दाखल झाले असून विविध आकार व प्रकारचे गड-किल्ले बच्चे कंपनींच्या पसंतीस उतरत असल्याचे व रेडिमेड किल्ले खरेदी करण्यासाठी अधिक पसंत करीत असल्याचे दिसून येत आहे. दिवाळी सणामध्ये बच्चे कंपनीमध्ये विविध गड-किल्ले बनविण्यासाठी स्पर्धा लागलेली असते.अशावेळी आ-पली तहानभूक विसरून बच्चे कंपनी गड-किल्ले बनविण्यात मग्न झालेले असतात. किंबहुना दिवाळी सुट्टीत तो त्यांच्या आवडीचाच छंद बनून जातो. परंतू सध्याच्या तंत्रज्ञान व मोबाईलच्या युगात प्रत्येक बाबतीत झटपट रिझल्ट हवा असतो. लहान मुलेही त्याला अपवाद नाहीत.त्यामुळे गड-किल्ले बनविण्यासाठी बच्चे कंपनी अधिक परिश्रम न घेता बाजारात विक्रीसाठी आलेल्या रेडिमेड किल्ल्यांना अधिक पसंती देऊन रेडिमेड किल्ले खरेदी करण्याकडेच त्यांचा अधिक कल दिसून येत आहे.

बाजारात फेरफटका मारला असता ठिकठिकाणी रेडिमेड किल्ले विक्रीसाठी ठेवण्यात आले असल्याचे दिसत आहेत. तर रेडिमेड किल्ले विविध आकार व प्रकारचे असल्याने बच्चे कंपनीचा कलही रेडिमेड किल्ले खरेदी करण्याकडे असल्याचे दिसून येत आहे.त्याचबरोबर किल्ला सजविण्यासाठी मालळे, प्राणी व छत्रपती शिवरायांचे छोटे पुतळेही खरेदी करून आपला रेडिमेड किल्ला अधिक आकर्षक कसा होईल यासाठी बच्चे कंपनीची धडपड चालली असल्याचे एकंदरीत परिस्थितीवरुन पहायला मिळत आहे.



# अंबा नदीवरील पुलाचे कामात दिरंगाई, सुधागड मनसेचा व्यापक जनआंदोलनाचा इशारा

### धोकादायक पुलांवरून होतेय वाहतूक, सावित्रीची पुनरावृत्ती होण्याची भीती

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सरकारी काम आणि बारा महिने थांब या म्हणीचा प्रत्येय पाली खोपोली राज्य महामार्ग पुलाच्या बाबतीत वारंवार येतोय, या धोकादायक पुलांच्या कामाकडे लोकप्रतिनिधी व प्रशासन देखील दुर्लक्ष करीत असल्याने जनमानसातून संताप व्यक्त होतोय. वाकण पाली खोपोली राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम मागील ५ वर्षांपासून संथ गतीने सुरू आहे. या मार्गावर पाली, भालगुल व जांभूळपाडा येथील अंबा नदी वरील नवीन पुलांचे काम काही महिन्यांपासून रखडले आहे. परिणामी जुन्या धोकादायक पुलांवरून सध्या वाहतूक सुरू आहे. याबरोबर पावसाळ्यात पुलांवरून पाणी गेल्याने वाहतूक देखील खोळंबते. यामुळे प्रवासी, चाकरमानी व वाहन चालकांची खूप गैरसोय होत आहे. या पुलासाठी मनसेच्या नेत्या लताताई कळंबे यांनी आमरण उपोषण केले होते, या पुलाचे काम जलद पूर्ण व्हावे यासाठी मनसे लढा उभारणार आहे, पुलाचे काम जलद न झाल्यास व्यापक जनआंदोलन करू असा इशारा सुधागड मनसेने दिलाय.



या ठिकाणी तब्बल २५ कोटीच्या निधीतून अधिक क्षमता, रुंदी आणि उंचीचे पूल तयार होत आहेत. या तिन्ही ठिकाणचे एका बाजूचे पूल जून महिन्यात पूर्ण होऊन तेथून वाहतूक सुरू होणे अपेक्षित होते. मात्र कामगार उपलब्ध नसणे, ठेकेदाराचे दुर्लक्ष अशा अनेक कारणांमुळे पुलांचे काम मागील ८ महिन्यांपासून जैसे थे आहे. हे तिन्ही पूल कमकुवत होऊन वाहतुकीसाठी असुरक्षित झाले आहेत. पावसाळ्यात तर पुलांवरून पाणी गेल्यामुळे प्रवासी व विद्यार्थ्यांची खूप गैरसोय होत आहे. त्यामुळे वेळीच नवीन पुलाची निर्मिती होणे गरजेचे होते. हे नवीन होणारे पूल दर्जेदार व लवकर पूर्ण झाले पाहिजेत. अन्यथा मनसे आंदोलन करेल असा इशारा सुधागड मनसे पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला दिलाय.

पाली, जांभुळपाडा व भालगुल येथील पुलांची केवळ एकोणीस टन वजन भार पेलण्याची क्षमता आहे. मात्र या पुलांवरुन साठ टनाची वाहतुक होत आहे. त्यामुळे हे पुल दिवसेंदिवस कमकूवत व धोकादायक होत आहेत. दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील पावसाळ्यात येथील पाली व जांभूळपाडा अंबा नदी पुलावरुन पाणी गेले. यामुळे दोन्ही बाजूची वाहतूक खोळंबली. तसेच पुलावरील सिमेंटचे व लोखंडी संरक्षक कठडे (रेलिंग) वाहून गेले आहेत. खड्डे पडले आहेत. याबरोबरच क्षमतेपेक्षा अधिक वजनाचे वाहने जाणे, पुला-वरील खड्डे यामुळे हे तिन्ही पूल वाहतुकीसाठी असुरक्षित झाले आहेत. नवीन पुलामुळे येथून प्रवास करणे सुरक्षित व सुलभ होणार आहे. मात्र हे काम रेंगाळले असल्याने नागरिक व प्रवासी संतप्त झाले आहेत. वाकण -पाली- खोपोली राज्य महामार्ग पुणे-मुंबई वरून खोपोलीमार्गे कोकणाकडे जाण्यासाठी वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. हा मार्ग मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय मानला जातो. तसेच मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग व मुंबई-गोवा महामार्गाला जोडतो. त्याच बरोबर येथून विळे मार्गे पुणे आणि माणगावला ही जाता येते. त्यामुळे मुंबई पुणे तसेच कोकणासाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे. परिणामी हे तिन्ही पूल लवकर पूर्ण होणे आवश्यक आहे. पाली अंबा नदीवरील नवीन पुलाची उंची १६ मीटर असणार आहे. तर लांबी ११० मीटर तसेच जांभूळपाडा पूलाची उंची १६ मीटर, लांबी ७० मीटर इतकी आहे. भालगूल पूलाची उंची देखील १६ मीटर तर लांबी ५५ मीटर असणार आहे. हे तिन्ही पूल चार लेनचे होणार आहेत.

## करंजाडेत देशी दारुचा साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बेकायदेशीररित्या देशी दारुच्या बाटल्या किराणा दुकानात विकणाऱ्या एका इसमास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेवून त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात देशी दारु संत्रासह इतर ऐवज हस्तगत केला आहे. मनोहारी रॉय (४०) हा इसम स्वतः जवळ बेकायदेशीररित्या देशी संत्रा दारु व इतर ऐवज असा मिळून २ हजार ६७० रुपये किंमतीचा ऐवज जवळ बाळगून त्याच्या याशिका जनरल स्टोअर्स पुष्पक नगर करंजाडे सेक्टर १ या किराणा दुकानात विकत असल्याची माहिती सपोनि चौधरी यांना मिळताच त्यांच्यासह शरद ढोले, पो.शि.महेंद्रकुमार धनगर व पथकाने त्या ठिकाणी छापा टाकून मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेनेच्या पेण शहर अध्यक्षपदी निकिता पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पेण शहर महिला अध्यक्ष पदी निकिता रुपेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॅशिंग महिला नेतृत्व निकिता पाटील यांच्या नियुक्तीने रायगड जिल्ह्यासह पेण तालुक्यातील महिला वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानु-सार तसेच रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील, महिला नेत्या स्नेहल जाधव, रायगड जिल्हा महिला अध्यक्षा सपना देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली निकिता पाटील यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पेण शहर महिला अध्यक्ष पदी बिनविरोध नियुक्ती करण्यात आली आहे.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माध्यमातून आपल्यावर देण्यात आलेली जबाबदारी स्विकारून महिला वर्गासह सर्वांना समान न्याय देण्यासाठी प्रयत्न करीत राहीन. तसेच महिलांसह सामान्य जनतेच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करून पक्ष बळकटीसाठी तन-मन-धनाने काम करणार असल्याचे मनसे नवनियुक्त पेण शहर महिला अध्यक्षा निकिता रुपेश पाटील यांनी पत्रकारांबरोबर बोलताना सांगितले.

## प्रसाद सावंत यांचा पुढाकार : नागरी वस्तीतील अपूर्णावस्थेत असणारी कामे युद्धपातळीवर सुरू

**दै.रायगड नगरी । माथेरान**

पर्यटनाला अधोरेखित असणारी असंख्य महत्वपूर्ण विकास कामे पूर्णत्वास जात असताना त्या त्या भागातील लोकप्रतिनिधीकडून काही कामे अद्यापही प्रलंबित आहेत.त्यामुळेच नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत होता पर्यटकांच्या वाढीसाठी त्यांना मूलभूत सेवासुविधा पुरविताना स्थानिक लोक ज्या ठिकाणी रहात आहेत त्यांच्या समस्यांकडे सुध्दा दुर्लक्ष होऊ नये यासाठी नगरपरिषदेचे गटनेते प्रसाद सावंत हे आता स्वतः जा-तीने लक्ष केंद्रित करून नागरी वस्तीतील लोकांच्या अडचणी दूर करण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करीत आहेत.



प्रभाग क्र ६ मधील अनेक वर्षांपासून रेंगाळलेली कामे मा नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या प्रयत्नांतून पूर्ण करण्यात येत आहेत गटनेते प्रसाद सावंत कामांची पाहणी करत आहेत ही कामे सुरू केल्याने परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण दिसत आहे. याबाबत येथील नागरिकांना विचारले असता त्यांनी सांगितले की आम्ही अनेकदा आमच्या समस्या संबंधित लोकप्रतिनिधीना सांगितल्या आहेत परंतु आजवर कुणीही सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. अखे-रीस आमचे गाऱ्हाणे नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या निदर्शनास आणून दिल्यावर नगरपरिषदेचे गटनेते तथा बांधकाम सभापती प्रसाद सावंत यांनी ताबडतोब याबाबत नगरपरिषदेच्या कर्मचारी वर्गाला सूचना करून जी काही अपूर्ण प्रलंबित कामे आहेत ती पूर्ण केली जात आहेत. यामुळे विशेषतः महिला वर्गाने नगराध्यक्षा प्रेरणा सावंत आणि प्रसाद सावंत यांचे आभार मानले आहेत.


### जाहिरात

तलाव ठेका शासन निर्णय दि.०३/०७/२०१९ अन्वये सन २०२१-२२ ते सन २०२५-२६ या पाच वर्ष कालावधीकरिता जिल्ह्यातील ५०० हे. खालील एकूण ४ पाटबंधारे तलाव ई-निविदे प्रक्रियेद्वारे मासेमारीकरिता ठेक्याने देण्यासाठी पात्र मत्स्यव्यवसाय संस्था / मच्छिमार / मत्स्यसंवर्धक / खाजगी उद्योजक यांचेकडून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर प्रक्रियेस दि.१०/११/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

याबाबतचा तपशिल मुख्य संकेत स्थळ http://mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे. तरी इच्छुक निविदा धारकांनी याचा लाभ घ्यावा आणि अधिकच्या माहितीसाठी शासकीय कार्यालयीन वेळेत सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय, रायगड-अलिबाग, तिसरा मजला, सिद्धी अपार्टमेंट, पेण रोड, चेंढरे, अलिबाग-४०२२०१, दूरध्वनी क्र. ०२१४२ २९५२२१ येथे संपर्क साधावा.

**सही-**
**(एस.आर.भारती)**
**सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय,**
**रायगड-अलिबाग**

**क्र.जिमाका/राअ/जाहि/१३७/२०२१-२२**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, माझे अशिल ममता सुनील परुळेकर उर्फ सौ.ममता अमीन तोडाई यांच्या नावे खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे सिडको ॲलाटमेन्ट लेटर, सर्व सिडकोचे पेमेन्ट पावती त्यांच्या नकळत हरवले आहे व बराच शोध घेवून देखील त्यांना ते अद्याप पर्यंत मिळालेले नाही. सदर मिळकतीचे वर्णन

**मालमत्तेचा तपशिल**
**प्लॉट नं.०१, सदनिका क्र.१०, आकांक्षा को.ऑप.हौ.सोसायटी, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**
**क्षेत्रफळ : ३२ मी**

वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भातील मिळकतीचे सिडको ॲलाटमेन्ट लेटर, सर्व सिडकोचे पेमेन्ट पावती कोणाला सापडल्यास ते नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत दाखल करावे. तसे न झाल्यास ते कागदपत्र गहाळ समजण्यात येईल व त्या कागदपत्रासंदर्भात कोणाकडून बेकायदेशीर काम झाल्यास त्यासाठी माझे अशिल जबाबदार नसतील याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑ.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, से.१२ खारघर**
**मो.नं.८८७९४१६४८३**


## माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत पाली ते रिलायन्स नागोठणे सायकल रॅली

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

माझी वसुंधरा या शासनाच्या अभियाना अंतर्गत सोमवारी (ता.१) पाली ते रिलायन्स नागोठणे सायकल रॅली काढण्यात आली होती. या रॅलीसाठी शिवऋण प्रतिष्ठान महाराष्ट्र व तालुक्यातील सायकलस्वारांनी पुढाकार घेतला.

याबद्दल तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी शिवऋण प्रतिष्ठान महाराष्ट्र व उपाध्यक्ष केतन म्हसके यांचे आभार मानले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हाधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व शासकीय योजनांचे महाशिबीर रिलायन्स-टाऊनशिप नागोठणे येथे आयोजित केले आहे. त्यानिमित्ताने पालीतील अनेक सायकलस्वार तेथे गेले आहेत.


### जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको शहरांचे शिल्पकार

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे. नें

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र हे.आर. | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **नोड- करंजाडे** | | | | |
| १ | ३२५ | करंजाडे III/KRSD/ SR-१२/१ | ७६/४<br>७३अ/१<br>७३/अ/३ब<br>७१/२<br>६४/३<br>९/१<br>७ड/३<br>७इ/२<br>७अ/२ | ०-१३-०<br>०-८२-७<br>०-०५-८<br>०-०७-१<br>०-०७-०<br>०-५०-३<br>०-०५-९<br>०-०३-५<br>०-१२-२ | १८५० चौ.मी. | मौजे करंजाडे, भूखंड क्र. १५, सेक्टर-४, क्षेत्र १६४९.५२ चौ.मी. | **मूळ भुधारक कै. मारुती गणू आंग्रे (मयत) यांचे प्रोबेट नूसार वारस,**<br>१) श्री. माधव उर्फ महादेव मारुती आंग्रे<br>२) श्री. गुलाब चंद्रकांत कडू<br>३) श्री. मंदा मोहन गायकर | निरंक |
| | ३२५ | करंजाडे १०New | ६४/१ब | ०-०७-५ | | | | |
| | ३२५ | करंजाडे २New | ७अ/५ | ०-१६-४ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. तसेच सदर हरकत अर्ज हे aclso.thane@cidcoindia.com या ईमेल वर सादर करावे. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२८४/२०२१-२२



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.मनोज खेमचंद धनतोले रा.पनवेल, जि.रायगड यांनी श्री.संतोष जगन्नाथ पवार रा.लोणिवलीवाडी, ता.पनवेल, जि.रायगड यांच्याशी सर्व्हे नं.९०/५ मौजे : लोणिवली, ता.पनवेल, जि.रायगड या जागेसंदर्भात :-

| भूमापन क्र. | भूमापन व उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ९० | ५ | १ | ०-३२-४०<br>पो.ख.०-३-००<br>एकूण ०-३५-४० | ५.०० |

वरील मिळकतीबाबत करार केले असून ते आज रोजी देखील त्यांचेवर बंधनकारक आहेत. त्यामुळे सदर मिळकतीबाबत कोणताही प्रकारचा करार आणि व्यवहार हा वर नमूद या इसमांशी करू नयेत. केल्यास तो आमच्या अशिलांवर तो बंधनकारक राहणार नाही. त्याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.मिनाक्षी बी.लसगरे**
**एम एच /६१७४/२०१४**
**शॉप नं.२६, अक्षर सिल्व्हर क्रेस्ट, जिओमेट्रीक्स, प्लॉट नं.२९, सेक्टर २५, खांदेश्वर रेल्वे स्टेशन समोर, पनवेल, नवी मुंबई-४१०२०९**
**मो.नं.८२०८४०७०७५**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.किशोर मनोहर खानावकर, रा.शिव प्लाझा को.ऑप.हौ.सोसायटी लि., प्लॉट नं.१४८, सेक्टर नं.१ ई, कळंबोली, नवी मुंबई. सदर प्लॉटचे कायदेशीर मालक आहेत. तरी या सदनिकेचे मे.मंगलमुर्ती कोमबाईन्स आणि जयेंद्र बबन शेळके यांच्यामध्ये झालेले मुळ दस्ताऐवज आमच्या अशिलांकडून गहाळ झालेले आहेत.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही विक्री देवाण-घेवाण, गहाण, विश्वस्त संस्था, वारसा भाडेकरार, ताबा, खरेदीखत, बक्षिस, मृत्यूपत्र, वाटप पत्र व इतर कोणतेही स्वरुपाचा करार असल्यास अगर इतर कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या पृष्ट्यर्थ सर्व कागदपत्रांची पुराव्यासह खालील कार्यालयीन पत्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत सुचित करणे आवश्यक आहे. जर असा प्रकारची कोणतीही हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाचाही कसलाही हितसंबंध राहणार नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल. प्रस्तुतच्या मुदतीनंतर सदरच्या रुमबाबतीत कोणाचाही व कसलीही हरकत आल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही व आमचे अशिल सदर परिशिष्टात वर्णन केलेल्या रुम बाबत विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**शिव प्लाझा को.ऑप.हौ.सोसायटी लि., प्लॉट नं.१४९, सेक्टर नं.१ ई, कळंबोली, क्षेत्रफळ : ५३.८ कारपेट ६४.५६ (बिल्टअप)**

**सही/-**
**ॲड.मंजित कौर**
**शॉप नं.८, क्रिष्णा टॉवर, सेक्टर ५ ई, प्लॉट नं.१२/१३, सिडको ऑफिस जवळ, कळंबोली, नवी मुंबई-४१०२१८**
**मो.नं.७७३८९००७७०**

